निशाणी क्र.०१ खाली

# न्यायनिर्णय

(दिनांक १३/१२/२०२५ रोजी घोषित)

आजरोजी आरोपीस पुकारले असता, आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी माझ्यासमक्ष हजर राहिले. आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी असे कथन केले की, आरोपीविरुध्द प्रस्तूत प्रकरणी काढण्यात आलेले भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २२९ अन्वये विशेष समन्सची बजावणी झाली असून आरोपीतर्फे सदरील गुन्हा कबूल करुन विशेष समन्समध्ये नमूद केलेल्या दंडाची रक्कम भरण्यास तयार आहे. आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी वकीलपत्र (निशाणी क्र.०३) दाखल केले आहे. तसेच पुरसीस (निशाणी क्र.०४) दाखल केली आहे. आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रस्तूत प्रकरणी आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी यांना गुन्हा कबूल करण्याचे अधिकार आरोपीने दिले असल्याचे दिसून आल्याने आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी यांचे गुन्हा कबूली बाबतचे निवेदन (निशाणी क्र.०५) वर नोंदविण्यात आले आहे. एकंदरीत, गुन्ह्याचे स्वरुप, रेल्वे बोर्ड यांच्याकडील Standing Order No.111, Railway Protection Force, Crime Manual, Chapter-5, Para 1.10(i) मधील तरतूद, प्रस्तूत फिर्याद, प्रस्तूत प्रकरणी आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेली कागदपत्रे व आरोपीविरुध्द काढण्यात आलेले विशेष समन्स या सर्व बाबींचा सारासार विचार करुन मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.:-

## आदेश

०१. प्रस्तूत प्रकरणी आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७५ अन्वये दोषी ठरविण्यात येत आहे.

०२. आरोपीस प्रस्तूत प्रकरणी दंड रु.२००/- इतकी द्रव्यदंडाची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास १० दिवस साध्या कैदेची शिक्षा ठोठाविण्यात येत आहे.

०३. आरोपीने दंड भरल्यास आरोपीस तात्काळ सोडण्यात यावे.

०४. प्रस्तूत प्रकरणात आरोपीकडून मुद्देमाल जप्त केला असल्यास सदर मुद्देमाल दंडाची रक्कम भरल्यानंतर आरोपीस तात्काळ परत देण्यात यावा व त्याबाबत संबंधीत रेल्वे सुरक्षा बल यांना रितसर कळविण्यात यावे.

०५. आरोपीला न्यायनिर्णयाची एक प्रत विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषित करुन संगणकमुद्रीत करण्यात आला.)

( पी. पी. बागूल )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, विरार

वसई रोड
दिनांक : १३/१२/२०२५